

# सकीना

वसंत बापट

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2396
REFBK-0021864
REFBK-0021864

संग्रहालय, ठा
पर्यंत पुस्तक/मासिक

# मानसी

वसंत बापट

REFBK-0021864
REFBK-0021864

मौज प्रकाशन गृह

पहिली आवृत्ती
एप्रिल १९७७

© वसंत बापट
१९७७

मौज प्रकाशन
क्र० २५०

किंमत पाच रुपये

चित्रे व रचना
मंगला जोशी

मुद्रक
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४०० ००४

प्रकाशक
श्री० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४०० ००४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२३७८ ३१०५
२१८६४
संदर्भ शाखा (स्थलः मन)

मानसी हा कवितासंग्रह नव्हे.
ही एक मालिकाकविता आहे.
आपल्या परीने स्वतंत्र असलेल्या छत्तीस कवितांनी
सफळ संपूर्ण केलेली ही एक कविता आहे.

मानसी म्हणजे कथाकाव्य नाही. तिला संविधानक नाही.
स्वैर सुनीतांच्या एकत्र गुंफणीतून एक कहाणी सांगू पाहणारे
हे खंडकाव्य नाही. कोणताही नवा प्रयोग वगैरे करण्याचा
हेतू मनात कधीच नव्हता. या सर्व कवितांचे स्फुरण
अविच्छिन्न आणि एकबीज आहे, एवढेच.

'मौज' दिवाळी विशेषांक
आणि 'सत्यकथा' मासिक यांमधून
मानसीचे बहुतांश पूर्वप्रकाशन झालेले आहे.
आता या समग्र प्रकाशनाची जबाबदारी घेऊन मित्रवर्य
श्री० पु० भागवतांनी मला ऋणी केले आहे.

वसंत बापट

# मानसी

१

तशा सगळ्याच कविता तुझ्यामुळे आणि तुझ्यासाठी.
अस्तित्वच जर तू भारलेले
तर काय नवल
सगळेच शब्द तू गर्भारलेले.

या साऱ्या कविता तर तुझ्याच.
काही गाणी : तुझ्या कानात गुणगुणण्यासाठी.
काही : तुलाच उमगणाऱ्या हाका.
काही टाहो :
वैराणात फुटून वैराणात विरून जाणारा.
आणि बहुधा या शेवटच्या कैफियती.

माफ कर शब्दांना, तू अस्वस्थ झालीस तर.
माफ कर शक्य तर मलाही.
तुझ्या हसऱ्या डोळ्यांच्या काठांजवळ
एक अश्रू उभा राहिला तर, त्याला माफ कर.

## २

जत्रा संपली तरी
देवळाच्या पाळीवर घट्ट बसून राहिलेल्या
जख्ख म्हाताऱ्या कुडमुड्याला
माझ्या आईने माझी कुंडली दाखवली.
मख्खपणे हसून तो जे जे म्हणाला
ते सर्व तसेच घडत आले आहे.

तो म्हणाला होता :
याला नेहमीच थोडासा उशीर होईल.
दुसरे : अतर्क्य गळाच्या हुकावर
अंतःकरण टांगून ठेवावे लागेल.
आणि एक सांभाळा :
हा मृगजळात समाधी घेईल.

खरेच मी आता सिद्ध आहे
स्वत्वाच्या खडावा काठावर ठेवून.

३

तुझा आवडता खेळ : आंधळी कोशिंबीर
डोळ्यांवर पट्टी बांधताना
कधी कधी तुझे ओठ लागत माझ्या कानांना
कधी माझे गरम श्वास
तुझ्या भुरक्या केसांतून
दुडदुडत जात.

पुढे तुझा एकेक चाळा नित्य नवीन
वाढवयातले वेंधळेपण वाढवणारा.
केवढ्या तरी मोकळ्या अंगणात
तू घालायचीस दुरून साद.
नेमका चुकायचा तेव्हा
माझा शब्दवेध.

पुढे कितीदा दिली मी मर्मभेदक हाक
जी तुला ऐकू आली नाही.

## ४

तू एकाएकी अंतर्धान पावलीस
मी एकाएकी भानावर आलो.
वर्ष वर्ष हरवण्याचा तुझा गुण
तेव्हा मला नवा होता.

मी पुस्तकातल्या मोरपिसाला विचारले.
ते माझ्यासारखेच थरथरले.
मग अंगणातल्या सायलीने
माझ्या हाती फुले ढाळली.

पेरूवरच्या चिमणीच्या दातांच्या खुणा
लवकरच बुजून गेल्या.
लाजऱ्या मनातल्या लक्षावधी पणत्या
विझून गेल्या.

आशा एकच होती : कधी तरी येशील,
मला दोष देशील.

५

आलीस तीच एखाद्या ग्रीक पुतळीसारखी.
अस्तित्वाच्या झिरझिरीत ओढणीमागील
मूर्तिमंत अमूर्तता.
डोळ्यांत मृगजळाची जीवघेणी जादू.
संगमरवरी अचल मुद्रा.
क्लासिक मानेच्या उतारावरती
माझ्या अधःपाताची निश्चित सोय.

व्याकूळ होऊन मी कौल लावला.
नेतिनेतीची नैतिक बैठक जराही न ढळवता
तू कठोर निर्णय दिलास.
तेव्हापासून
तू दिलेला पूजेचा अधिकार
मी सांभाळला
मूर्तीला स्पर्श न करण्याची शपथ पाळून.



६

मोरपिसासारखी दोन बोटे डोळ्यांवर फिरवून
ती माझ्यापुढे नाचवीत
एकदा तू म्हणालीस :
एक बोट धर पाहू.
मी विचारले : का ? कशासाठी ?
तू म्हणालीस : मुकाट्याने बोट धर आधी.
सुलताना रझियाच्या गुलामाच्या आदबीने
मी तुझे बोट धरले.

बोट सोडवून घेतलेस आणि टाळी वाजवलीस
तेव्हा मात्र दचकलो :
हा तर शिरच्छेदाचा संकेत.
माझे भय कधी खोटे बोलत नाही.
तू म्हणालीस : बिचारा तू
न धरलेल्या बोटावर तुझे नाव होते !

७

जिना उतरताना पैंजण वाजावेत
तशी हसत गेलीस : इथून तिथे.
ताशा मशिनगनसारखा वाजला
आणि मंत्राक्षतांचे छरे
चंद्रज्योतीसारखे फुटले
तेव्हा माझ्या डोळ्यांसमोर अंधारी आली.
जागा झालो तर तू गहिवरून सांगत होतीस :
अतिश्रमाचा परिणाम हा.

मग मी उपमा शोधीत राहिलो :
जणू काही : काही जणू : म्हणू काय : काय म्हणू.
पुष्कळ पोथ्या पालथ्या केल्या.
दळणदार भावगीतांच्या तबकड्या ओरपल्या.
शेवटी व्यावसायिक कवींना विचारले.
उत्तर एकच : हा आमचा विषय नाही.

## ८

माझी अशी समजूत आहे
आपण असतो मूलतत्त्वांची मुले.
प्रत्येकाची प्रमाणे वेगळी असतात एवढेच.
तू आहेस जलवंती : पाण्याची कन्या.
पावसात हरखतेस
माहेर भेटल्यासारखी.
समुद्रात फिरतेस
सराईत मासोळी जशी.

लोकांना दिसतात विजोड मिथुने
उंची : वजन : माप : रूप : बुद्धी
तेजःपुंज वराशेजारी होणारी
जलवंतीची वाफ
आभाळमातीच्या त्रिशंकू लेकराला
पोळत असते.

९

तू असशील निवांत विसावलेली
मी जेव्हा धावत सुटलो रानोमाळ.
श्वास थांबेल म्हणून थांबलोच नाही.
ठेच लागे कधी ठेचेवरतीच.
उसंत घेतली नाही उसाशाला.
मी धावत होतो ग्रंथालयात.
धावत होतो मानेवरती खडा ठेवून.
अंधारात धावता येणार नाही म्हणून
धावत होतो झगमगणाऱ्या प्रकाशात.
खोडा पायात पडला तरी धावत होतो.
संकल्पांच्या हातांमध्ये हात गुंफून
धावलो...तरी सावली हाती आली नाही.

किती आलो दूर दूर रस्ता चुकून
तरी कसा पोचतो जिथे होतो तिथेच !

१०

दशोपनिषदांच्या दशा माझ्या चक्री पागोट्याला.
कपाळावर भगवद्‌गीतेचे गंध.
सहा पट्टे दर्शनांचे
प्रत्येक दंडावर तीन तीन.
आणि ही चाळशीची भिंगे
म्हणजे दोन योगवासिष्ठेच जाडजाड.


मस्तकात पतंजलीचा अनाहत नाद.
जवारदार वैखरीचा तंबोरा
प्रत्येक शब्दामागे.
शब्दज्ञानाच्या खणखणीत खडावा.
हातात काव्यशास्त्राचा कमंडलू.
खांद्यावर लाल शालजोडी जरतारी.

आता फक्त तूच विचारू शकतेस :
सिनेमातल्या गाण्यांच्या भेंड्या लावू या का ?

११

मी सभाजनांना सांगतो :
आरंभी जर सत् असेल तर असत् येईल कुठून ?
बरे, असत् असेल...तर ते 'असेल' कसे ?
तेव्हा सत् हेच असत् असून असत् सत् असते !
श्रोते मान डोलवून म्हणतात :
हे वाचिश्रव्या, तू बोलत रहा.
ही संधी घेऊन मी म्हणतो :
सूक्ष्म सत्याचे स्थूल रूप आपण पहातो
तेव्हा स्थूल सत्याचा सूक्ष्म साक्षात्कार होतोच.
नाही समजले ?
वर्णमालेपासून ॐकारापर्यंत
पुनश्च सगळे म्हणून दाखवू का ?

सर्वांना न कळत, पोथीच्या प्रत्येक पानात
मी तुला पाकळीसारखी डकवलेली असते.



१२

रक्ताच्या थुंदांसारख्या लालभडक गुंजा
सोन्याच्या साखळीत गुंफून गळ्यामधे घातल्यास
तेव्हा मला वाटले
माझ्या पराभवांची ही सुंदर फुले...

वालावलीच्या कुळागरात
सायंकाळची रडली होतीस
त्यावेळी चुंफलेल्या लाल डोळ्यांचे गुलाब
तू आता केसांमधे माळतेस.

इवल्या इवल्या काळ्या क्षणांची
मुलायम मंगळसूत्रे होतात.
मधेच गुंफलेले दोन उजळ केरवे मणी
कधी तरी दातांत धरत जा.
तुला माहीत आहे ना...
माझे प्राण मी त्यांच्यात लपवले आहेत.

## १३

घाटावरती काळोखाच्या ढगाखाली
किती वेळ बसून राहशील?
नावाड्याने नाव पुन्हा आणली आहे.
तो तुझ्या माहेराहून आला आहे.

कधी कधी हिशेब चुकतात. म्हणून काय?
पुन्हा काय ताळा कोणी जमवत नाहीत?
आलोचन जाग्रणांच्या पारण्यासाठी
जुनी स्वप्ने खरोखरच चालत नाहीत?

सर्व सर्व शहाणे प्रश्न वेडे ठरले.
ठीक आहे, उत्तरदेखील वेडे द्यावे.
बोल ना, बोल ना, बोल ना.
काळोखात घाट पुरता बुडून गेला.

नाव धारेला लागेल निरुपायाने
तेव्हा मात्र आक्रोश करीत राहू नकोस.

१४

आज प्रातःकाळी
उंबऱ्याला अचानक फूल आले.
आपल्या दुखऱ्या डोळ्यांवरती
माझा नाही मुळीदेखील विश्वास उरला.

स्वागत करण्यापुरते जवळ हासू नव्हते.
आसू तरी हुकमासरशी येतात कुठे !
मधली स्थिती
म्हणजे एक थबकलेली प्रलयलाट !

तुझ्या हाती उघडलेले एक दार
दुसरे दार मिटलेले ते माझ्या हाती.
शब्द म्हणजे माझे अगदी जिगर दोस्त
मित्र कधी वैऱ्यांपेक्षा घात करतात...

अशा वेळी चारच शब्द बरे असतात :
कसे काय...ठीक ? ठीक.

१५

तू म्हणालीस : एकदा क्षमा केली म्हण.
वेळेवरती माझा शब्द फुटला नाही.
एकाएकी विजेपेक्षा वीज झालीस
आंगभर कोसळलीस, बेहोषीत.

तू म्हणालीस : तुला काही कळत नाही.
कबूल आहे.
तू अगदी वाइट्ट आहेस, दुष्ट आहेस.
कबूल आहे. म्हणशील ते ते कबूल आहे.

तरी देखील पापणीपापणी पावसामधे
उंच उंच मनोरेही बुडून गेले.
आता लख्ख ऊन पडो आभाळभरून
बुडालेले गाव पुन्हा उगवत नाही.

पहिल्यावहिल्या चांदण्याने चकवा दिला
आणि आता अवेळ झड शिळंधार.

## १६

वेड लागत नाही हीच खरी शोकांतिका.
वेड किती सुंदर असते :
एका गोड अंधारात
आपण आपले गुडूप व्हायचे.
साई सुट्यो साद घातली
तरी कोणी नाहीच यायचे.
आपण आपले, आपले आपण
ओसाडगावचे जहागिरदार.

शहाणपणही वाईट नसते
जिकडे तिकडे लख्ख उजेड, सरळ वाटा.
शहाण्याचा आत्मादेखील
चौरसचौरस नीटस असतो.

आमचा आपला एकच खेळ :
एक पाय तळ्यात, एक पाय मळ्यात.

१७

तारुण्याचे सारे वेड
तारुण्यातच सरले पाहिजे
बालपणाचे काय करू ?
झपाटणाऱ्या कल्पना : भातुकलीची भांडी
काढावी, ठेवावी. ठेवावी, काढावी.
तर काय म्हणत होतो
पुन्हा एकदा पहिल्यापासून
खेळ खेळ खेळू या ?

दोनच घटका उरल्या आहेत
तेवढ्यात खेळून घेतले पाहिजे.
मग आतून बाहेरून अंधारेल
एक कठोर हाक येईल
कोणी तरी प्रश्न करील :
म्हटलेत का रोजचे पाढे आणि परवचे !

१८

तू म्हणालीस : विसरायलाही शिकले पाहिजे.
नाटकात कसे नाटक असते
तसे स्वप्नात स्वप्न पडते.
समज भेट झालीच नव्हती
समज भास झाला होता.
स्वप्न मावळल्यावर उरते
पूर्वीपासून चालत आलेले स्वप्नच.
त्यात आपण रमून जावे.

भांबावलेली भाबडी मुद्रा
अधिक बावळट झाली असेल !
दया येऊन तू म्हणालीस :
कधी तरी आपण मोठे व्हायलाच हवे.
मोठेपणाचे एक लक्षण : अनुसरणे
दुसरे : विसरणे.

१९

समजावणीच्या अंगाईने
कधी झोप लागत नाही.
फुंकर म्हणजे अधिक दुःख.
अंधारातल्या आक्रोशाहून
प्रकाशातला प्राणान्त बरा.
सर्वांत सोपा उपाय :
आत्मनिंदेचा कैफ ओसरू देऊ नये.
हे तुला पटवू कसे !


तू माझी शपथ घेतेस : कध्धी कध्धी...
मी तुझी शपथ घेतो : पुन्हा नाही...
तू मला वचन देतेस : खरं खरं...
मी तुला वचन देतो : तुझ्यासाठी...

तुझ्या प्रसन्न प्रामाणिकपणाचा
हेवा वाटतो, भय वाटते.

# २०

कितीदा तुला सांगितले
वळचणीपाशी उभी राहू नकोस रात्रीची.
माझ्या अंगणात पागोळ्या टपटपताना
तू येऊ नकोस जवळपास.
हे पावसाळी उत्तररात्रीचे प्रहर
त्यांचा कहर तरी किती...
आधी झोप मोडतात
मग भलभलते भास, फुलांचे वास...
आता स्वप्नही पडणार नसते
मग कुणी झोपावेच कशासाठी ?
डोळे टक्क पहात राहतात
खिडकीशी अंधारावर पडलेली तुझी सावली.

पहाटे तापलेल्या कपाळावर
तुझा मऊ तळवा तू ठेवू नकोस.



२३९५ काव्य
२७१५८

## २१

हिवाळ्याच्या दीर्घ रात्री
वणवा होता अटळच.
शुष्क फांद्या वाऱ्यावरती जवळ आल्या,
प्रळयंकारी वणवा होता अटळच.
मी म्हणतो : त्याच्यापुढले
तुझ्या हाती उरलेच काय ?
डोंगर सगळे करडे सुके झालेले
आणि जवळ अश्रूंवाचून ओल नाही.

तरी बरे, आभाळाला सीमा नाही,
पंखांमध्ये थोडी तरी थरथर आहे !
मी म्हणतो : अशा वेळी
वणव्याचीही कोंडी फोडून
आक्रांताने गाठले पाहिजे
चिमण्या अंगणातले वठलेले जुने झाड.

## २२

वर्मी घायाळ झालेल्या फुलचिमणीसारखी
माझ्या अपुऱ्या ओंजळीत
थरथरत कोसळलीस.
भितुर भितुर डोळे फडफडले.
तू विचारलेस : मी कुठे आहे.
माझ्या काळजाची ऊब देऊन
मी एवढेच म्हटले :
जिथे हवीस तिथेच.

तुला जायचे होते परत
श्रुतिस्मृतिपुराणांच्या प्राकारातल्या
सीतासावित्रींच्या देवळात.
मी तुला एकच इशारा दिला :
प्रदक्षिणेच्या वाटेवर चाकोरी आहे
चुन्याच्या घाणीतल्या खळगीएवढी खोल.

२३

ज्या गावाला जायचे नव्हते
का विचारलीस त्याची वाट, तीही मलाच?
मी तुला सांगितले होते
रक्तजास्वंदीच्या ताटव्याकडून जाऊ नकोस.
तरी गेलीस भुर्रदिशी.
मोहनवेल ओलांडू नकोस
घर पुन्हा सापडणार नाही.
तरीदेखील ओलांडलीसच.

आता निदान एवढे कर
परतीची वाट मला विचारू नकोस.
माझ्या काळजाच्या कोपऱ्यात
तुझ्यासाठीच खोपा आहे
पंख मिटून, थरथर थांबवून
आता जरा स्वस्थ रहा.

२४

वणवा लागला तेव्हा
नव्हतो मी नव्हतीस तू.
ज्याचे घरटे त्याने उद्ध्वस्त केले,
तू अजून काय शोधते आहेस?

तसा धक्काही लागलेला नाही पराला.
काडीदेखील निखळलेली नाही.
पिले खुशाल चिवचिवताहेत.
झालेला विध्वंस तुला माहीत की मला.

आभाळाच्या काळोख्या घुमटात
काळ्या पाकोळीसारखी भिरभिरू नकोस.
तुझा जखमी पंख माझ्या खांद्यावर ठेव.
प्राक्तनाची अंधारी ढोली सोडून
आपण जाऊ या नवख्या प्रदेशात
चांदणे वेचणाऱ्या चोची आहेत, तोवर.

## २५

त्या बाजूला का गेलो कसे गेलो
ते आता आठवत नाही.
आठवतो गवताचा अफाट माळ
आणि एक चिंच
अस्ताव्यस्त झिंज्या पसरलेली.
आभाळाचा रंग आठवत नाही.
टेकडीच्या वारुळातून आलेली
पायवाट आठवते पायाला डसलेली.
आठवत नाहीत पाखरांचे थवे
त्यांचा किर्र शब्द तेवढा आठवतो.


तूदेखील आठवत नाहीस सगळी.
आठवतो तळहात घामाने ओलावलेला
आणि आठवतात
पंचप्राण झालेले दोन डोळे.

२६

थुईथुई नाचणारे तुझे डोळे
एकाएकी डोहापेक्षा डोह झाले.
ते तसे होवोत म्हणा
माझे सारे आभाळ
त्यांनी केव्हा हृदयाशी घेतले
ते मला कळले नाही.

रक्ताच्या भरतीमध्येच
ओहोटीची मरणओढ येते कुठून ?
किनारे सुटून जातात.
चहूदिशा निळेच उरते
ते रूप कुणाचे
तुला मला कळले नाही.

कळले नाही, आणि काही कळत नाही
हेदेखील त्या वेळी कळले नाही.



२७

आधीच समुद्राचे वेड
त्यात चांदण्यातली निवांत वेळ.
माझे समुत्सुक हात
अचानक खेचून घेत
तू म्हणालीस : पाण्यात चल.
नव्या धिटाईने मोहरलेला मी
पहातच राहिलो
तुझ्या अस्तित्वाची विराट लाट.

त्या रात्री
समुद्र आणि चांदण्याची
वादळमिठी पडली.
आपले देह असतात
किती विसराळू.
मनावरती एकएक खूण वज्रलेप.

२८

देवीच्या देवळात पाऊल ठेवताना
नव्हते समजले तुझे मनोगत.
नास्तिक पीळ सैल झाला होता
तो तुझ्या स्पर्शाचा विजय.

तू म्हणालीस : बघ ना
देवी किती गोड आहे नाही ?
निष्पाप मुद्रा पाहिल्यावर
मन कसं शांत शांत होतं.

तुझ्या मनाचा गूढ तळ दिसला मात्र
माझं मन पुन्हा एकदा पेटून उठलं.
पापपुण्यांच्या दुतर्फा दऱ्या टाळून
मी निघालो अरुंद पायवाटेने.

गाभाऱ्याच्या पाणथळीतले भुइचाफ्याचे फूल
जपले आहे : तो तुझा प्रसाद.

२९

अखेर निर्जन बेटावर
चौफेर हल्ला कोसळला.
रोखलेल्या बोटांच्या हजारो संगिनी
मुलुखमैदान तोफा
आणि बाण विष पाजवलेले
सर्वांनी डाव साधला.

ज्याला मरणापेक्षाही दुःख
कसेबसे जगण्याचे
त्याची तटबंदी असते अभेद्य.
त्यांनी अचूक टिपण साधले
तुझ्या पापभयाचे :
आणि तिथेच मानला मी माझा पराभव.

सत्य आपले आणि दुबळे असते
न्याय त्यांचा आणि समर्थ असतो.


३०

मला माहीत आहे :
एकदा एका राजकन्येने
भाळावरचा डाग
जन्मभर मिरवला सौभाग्यतिलकासारखा.

रानभरी झालेल्या टिटवीचा आकांत
आकाशाचे टवके काढतो.
काळ्या सरोवरात बुडी घेताना
राजहंसी जराही कलकलत नाही.

मला माहीत आहे :
दुखावल्या हृदयाचे घब्याळ
मनगटावर मिरवण्याइतकी
तू वेंधळी नाहीस.

तू काहीच बोलत नाहीस.
ऐकू येतो तो मौनाचा आक्रोश.



## ३१

ते मला न्यायला आले
तेव्हा नवा प्रातःकाळ झालेला होता.
रात्रभर चुंफून दुःखाचा विखार
मी शिणून झोपलेला होतो.

त्यांना माहीत नव्हता
तो तुझा अपरिवर्तनीय पीळ.
ते समजले :
वासनेच्या सुलभ वेदीवर
तू चढलीस दुर्दम्य मरणवांछेने.
त्यांनी ठरवले तुलाही अपराधी.

माझी मान ताठ होती
ती एकाच अनावर आनंदाने :
ते घालताहेत एकच बेडी
चिरविरही हातांमध्ये.

## ३२

ते म्हणतात : या गुन्ह्याला क्षमा नाही.
आमचे गणित सरळ आहे,
एकामध्ये एक मिळून जातो
तेव्हा उत्तर शून्यच यायला हवे.

मनूने हा सिद्धांत मांडला.
याज्ञवल्क्य हेच सांगतो.
सगळ्या पोथ्या वाचूनदेखील उत्तर हेच.
∴ तुमचे मरण शास्त्रानुसार अटळ आहे.

ते म्हणतात : आरोप सिद्ध झाला आहे
विधिपूर्वक क्षमा मागा.
खाटकाहातून मरण्यापेक्षा
यज्ञ किती श्रेयस्कर : ते म्हणतात :
किती तरी वर्षांनंतर
मिथुनबळी मिळतो आहे!

३३

खबरदार, चांडाळांनो, हात उचलाल तर...
खबरदार, तिच्याकडे बोटही केलेत तर.
पापपुण्याच्या संगमाजवळ
ती खेळते आहे लडिवाळ अल्लडपणाने.
माझ्या सशाच्या पिलाला पकडायला
जाऊ नका तुमचे धर्मशास्त्र भुंकत.
मला जेर करा
तुमच्या कायदेबाज जाळ्यात.
कुर्यात्-न-कुर्यात्‌चा दुधारी भाला
खुश्शाल खुपसा तुम्ही माझ्या मर्मामधे.
माझ्या कबुलीजबाबाचा सूळ
मी नेतो ना माझ्या खांद्यावरून.


अखेरची इच्छा तरी विचाराल ना!
प्राजक्ताच्या फुलाला पायदळी चुरडू नका.

३४

कशी दचकलीस वैतरणेच्या काठाशी.
मी तुला सांगत होतो
माझ्यावरती थोडा तरी विश्वास ठेव
पलीकडचे कोणालाच माहीत नाही.

धीर धरून
पाहू या तर पुढे जाऊन.
अंधाराच्या पाठीमागे
असेलदेखील दोघांपुरते नवे आभाळ.

बहुधा माझी कीव येऊन
तुझे डोळे पाणावले.
तू म्हणालीस : काही म्हण
चुलीवरचा वास कसा खमंग येतो.
पांघरुणात सवयीच्या गुडूप व्हावे...
दिसत नाहीत भुते...किंवा देवदेखील!



## ३५

आकाशाचा वेध घेऊन
पाताळात पोचलो आहे खोल खोल.
तरी एक समाधान :
तू तुझ्या पृथ्वीवरती खुशाल आहेस.

माझे पंख मीच खुडून
समुद्रात टाकून दिले राजीखुषी.
अनावर झालो तरी
आता कधी पृथ्वीवरती येणार नाही.

इतके सारे झाले तरी
पुन्हा पुन्हा तुझे डोळे
मागत असतात विश्वासाने आश्वासन.
तू अगदी भिऊ नको :
फार झाले तर, कपिलाषष्ठीला
स्वप्नामध्ये येत जाईन.

३६

तुला वाटते
करुणा जागी व्हावी म्हणून
मी ओढतो माझ्याच पाठीवर
अव्याहत आसूड.
मी म्हणतो
माझ्यासाठी करू नकोस माझी कीव.
बाकी सर्व सोसता येईल
इमानाची शंका तेवढी घेऊ नको.

तू आता एवढेच कर :
अंगणामधल्या चांदण्यात
बाळाला अंगाई गाताना
जाऊ नकोस दक्षिणेच्या कुंपणाजवळ.
पाताळातून वर येणाऱ्या पिंपळामुळे
तिथला चिरा ढळला आहे.

२३९८ काव्य
२१८६४
REFBK-0021864
REFBK-0021864